# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १६३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. शिवलाल सखाराम राठोड,<br>मु. पो. हळ्ळी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी. बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार.

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. शिवलाल सखाराम राठोड, मु. पो. हळ्ळी ता. जत, जि. सांगली यांनी परिशिष्ट अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ मधील नियम ६.१० नुसार वितरण कंपनी विरुध्द मंचाकडे तक्रार दि. १६.७.२०१० रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

तक्रारदार यांनी हळ्ळी,  गट क्र. १३८ येथील शेतीपंपास नवीन विद्युत पुरवठा मिळणेसाठी वितरण कंपनीच्या कवठे महांकाळ विभागांतर्गत संख उप विभागाकडे अर्ज देवून प्रोसेसिंग फी रु.५०/- दि. ३१.५.२०१० रोजी पावती क्रमांक ५३४४४३६ नुसार भरली आहे. कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली.  यापूर्वी त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र.२३७ दि. १.७.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ७६८० दि. ५.७.२०१० नुसार आदेश पारीत  करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आलेस ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. त्याच्या नाराजीने सदरची तक्रार मंचाकडे प्रतिधीमार्फत दाखल केली आहे. तक्रारीसोबत पैंसे भरलेल्या पावतीची झेरॉक्स जोडली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ७.८.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी वीज पुरवठा मिळावा म्हणून दि. ३१.५.२०१० रोजी प्रोसेसिंग फी भरल्याचे मान्य केले आहे. त्यांना दि. ३०.७.२०१० रोजी चलन देण्यात आलेले आहे.  त्यांचे ०.०९ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १७.८.२०१० रोजी सुनावणी घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता, संख उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता हजर. तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रारदार यांनी प्रोसेसिंग फी रु.५०/- दि. ३०.६.२०१० पूर्वी चलन देणे जरुरी होते ते तक्रारदार यांना दि. ३०.७.२०१० ला देण्यात आले त्यामुळे ४ आठवड्यांचा विलंबाची रु.४००/- भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे. वि.प.ने ॲडिशनल टी.सी.चे काम आहे असे सांगितले व  कोटेशनची प्रत मंचासमोर दाखल केली आहे.  वि.प.ने विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही.

मा. विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार कृती मानके व पुरवठा संहिता व पुरवठ्याच्या इतर अटी विनियम २००५ यातील तरतुदींची पालन व अंमलबजावणी करणे हे वि.प.चे कर्तव्य आहे.  कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार वितरण मेन्सचा विस्तार असलेस १ महिन्यात चलन देणे ही वि.प.ची जबाबदारी आहे.  त्याची पूर्तता करण्यात वि.प.ला अपयश आल्याने झालेल्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- भरपाई ग्राहकास देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. वि.प.ने ४ आठवड्यांच्या विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. चलन मिळण्यास विलंब झाल्याने तक्रारदारास भरपाई मिळणेचा हक्क आहे व वि.प.ची ती जबाबदारी आहे. वि.प.ने ४ आठवड्यांच्या विलंबापोटी रु. ४००/- भरपाई तक्रारदारास द्यावी. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचा कवठे महांकाळ विभाग / संख उप विभाग यांनी दि. ३०.६.२०१० ते ३०.७.२०१० या कालावधीतील ४ आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/- या प्रमाणे रु. ४००/- भरपाई तक्रारदार यांस भरपाई द्यावी.

३) सदरची रक्कम २ बिलींग सायकलमधून समायोजित करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा(पूर्व),मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

c